**ठळक बातम्या**

- बलिप्रतिपदेचा सण सर्वत्र उत्साहात साजरा, सोनं - चांदी दरात घसरण
- खाद्यतेल उत्पादक आणि संबंधितांना केंद्र सरकारकडे साठ्याची नोंदणी करण्याचं बंधन
- ज्येष्ठ अंतराळ शास्त्रज्ञ, पद्मभूषण डॉ. एकनाथ चिटणीस यांचं निधन
- फरार व्यापारी मेहुल चोकसीच्या प्रत्यार्पणाविरोधातली याचिका बेल्जियममधल्या अँटवर्प न्यायालयानं फेटाळली

**आणि**

- उपांत्य फेरीतलं स्थान निश्चित करण्यासाठी महिलांच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत उद्या भारत आणि न्यूझीलंड सामना

**<><><><><>**

दीपावलीच्या प्रकाश पर्वातला बलिप्रतिपदेचा सण आज सर्वत्र साजरा होत आहे. साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानल्या जाणाऱ्या या सणाच्या दिवशी नवीन खरेदी किंवा उपक्रमांचा प्रारंभ केला जातो. विक्रम संवत २०८२ पिंगलनाम संवत्सराचा प्रारंभही आज झाला. गुजराती नागरिकांचं नव वर्षही आजपासून सुरू झालं. पती-पत्नीच्या नात्याचा सण मानल्या जाणाऱ्या पाडव्यानिमित्त घरोघरी सजावट, फराळ आणि खरेदीची लगबग दिसत आहे. अनेक ठिकाणी पाडवा पहाट कार्यक्रमांचं आयोजन झाल्यानं अनेक जण उत्साहात त्यात सहभागी झाले होते. नवीन वाहनं, कपडे, भेटवस्तू, मिठाई खरेदी करण्यासाठीही बाजारात गर्दी दिसत होती. उत्तराखंडमधल्या उत्तरकाशी जिल्ह्यातल्या गंगोत्री धामची कवाडं आज अन्नकुट सोहळ्यानंतर संपूर्ण हिवाळ्यासाठी बंद करण्यात आली. यानिमित्तानं मंदिरावर रोषणाई करण्यात आली होती तसंच  मंदिरात फुलांची आरास करण्यात आली

होती. यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. यावेळी गंगा मातेची पालखीतून मिरवणूक काढण्यात आली. या हंगामात गंगोत्री आणि यमुनोत्री धामला सुमारे १४ लाख भाविकांनी भेट दिली. उद्या भाऊबीजेच्या दिवशी यमुनोत्री आणि केदारनाथ धामची कवाडं बंद केली जातील.

**<><><><><>**

पाडव्याच्या मुहुर्तावर सर्वसामान्यांना दिलासा देत सोनं आणि चांदीच्या दरात आज मुंबईच्या बाजारपेठेत घसरण झाली. सोनं तोळ्या मागे पावणे ४ हजार रुपयांनी तर चांदी किलोमागे १० हजार रुपयांनी आज स्वस्त झाली. तरी ९२ कॅरेट सोन्यासाठी तोळ्यामागे सव्वा लाख रुपये आणि एक किलो चांदीसाठी १ लाख ५७ हजार रुपये मोजावे लागत होते.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं सर्व खाद्यतेल उत्पादक, प्रक्रिया करणारे, मिश्रण करणारे, पुन्हा पॅकिंग करणारे आणि या संपूर्ण पुरवठा साखळीत सहभागी असलेल्या प्रत्येक संबंधिताला नोंदणी करणं बंधनकारक केलं गेलं आहे.

यासोबतच या सर्व भागधारकांना उपलब्ध करून दिलेल्या पोर्टलवर दर महिन्याला, त्यांच्याकडच्या उत्पादनांची आणि साठ्याची माहिती देणंही अनिवार्य केलं गेलं आहे. यामुळे खाद्यतेल क्षेत्राशी संबंधीत अचूक आकडेवारी संकलित करणं, साठ्यावर देखरेख ठेवणं आणि याआधारे धोरणांची आखणी करताना मदत होणार असल्याचं विभागानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या मतदानासाठी अर्ज मागे घेण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे. त्यानंतर सर्व मतदारसंघातलं चित्र स्पष्ट होईल.

कैमुर जिल्ह्यातल्या मोहनिया मतदारसंघातून राष्ट्रीय जनता दलाच्या उमेदवार श्वेता सुमन यांचा उमेदवारी अर्ज रद्द करण्यात आला आहे. सुमन यांचं जात प्रमाणपत्र अवैध ठरवल्यानंतर त्यांचा अर्ज रद्द केला. काल, भारतीय जनता पक्षाने बिहारच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या कार्यालयात या संदर्भात तक्रार दाखल केली होती. दरम्यान, जात प्रमाणपत्राच्या वैधतेवर निर्णय घेण्याचा अधिकार निवडणूक अधिकाऱ्यांना नाही, हे प्रकरण स्क्रीनिंग कमिटीकडे पाठवायला हवं होतं. मात्र, ही कारवाई भाजपच्या दबावाखाली झाल्याचा आरोप श्वेता सुमन यांनी केला आहे.

रालोआ सरकार सत्तेत आलं तर बिहारला विकसित राज्य बनवण्याचं स्वप्न पूर्ण होईल, असं आश्वासन बिहारचे मुख्यमंत्री नीतिश कुमार यांनी आज एका प्रचारसभेत दिलं. उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी, केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांनीही आज विविध ठिकाणी सभा घेतली.

महाआघाडी सत्तेत आली तर स्वयंसहायता गटांशी संबंधित जीविका दीदी आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सरकारी नोकरी देण्याचं आश्वासन राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी प्रसाद यादव यांनी दिलं आहे. बिहारचे काँग्रेस प्रभारी कृष्णा अल्लावरू यांनी महाआघाडी राज्यातले प्रश्न आणि समस्यांवर एकजुटीनं काम करेल, असं आश्वासन दिलं आहे.

**<><><><><>**

केंद्रीय गृह मंत्रालयाची उच्चाधिकार समितीनं आज नवी दिल्लीत विविध मुद्द्यांवर लडाखच्या नेत्यांशी चर्चा केली. गेल्या महिन्यात लडाखमधे झालेल्या हिंसाचारानंतर महत्त्वाच्या मुद्द्यांवर पहिल्यांदाच औपचारिक चर्चा झाली. या चर्चेत कारगिल लोकशाही आघाडी, लेहमधल्या आंदोलनकर्त्यांच्या शिखर संस्थेचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

<><><><><>

ज्येष्ठ अंतराळ शास्त्रज्ञ, पद्मभूषण डॉ. एकनाथ चिटणीस यांचं आज सकाळी पुण्यात निधन झालं. ते १०० वर्षांचे होते. इस्रोच्या जडणघडणीत त्यांनी मोलाचं योगदान दिलं होतं. डॉ. होमी भाभा यांच्यासह भारतीय अवकाश कार्यक्रमाची मुहुर्तमेढ रोवणाऱ्या शास्त्रज्ञांमध्ये त्यांचा समावेश होतो. देशातला इन्सॅट हा पहिला दूरसंचार उपग्रह बनवण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. श्रीहरीकोटा आणि थुंबा इथल्या प्रक्षेपण केंद्राची जागा निवडण्यात त्यांनी पुढाकार घेतला. १९७० च्या दशकापासून त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे १९९० च्या दशकात देशात खेडोपाडी टीव्ही पोचले.

<><><><><>

फरार व्यापारी मेहुल चोकसीच्या भारतात प्रत्यार्पणाविरोधातली याचिका अँटवर्प इथल्या अपील न्यायालयानं आज फेटाळली. १३ हजार कोटी रुपयांच्या पंजाब नॅशनल बँक घोटाळा प्रकरणी तो मुख्य आरोपी आहे. त्याचं नागरिकत्व हा त्याच्या भारतात प्रत्यार्पणात अडथळा नाही, असा निर्वाळा न्यायालयानं दिला. मेहुल चोकसीची याचिका न्यायालयानं फेटाळल्यानंतर आता त्याच्यासमोर बेल्जियमच्या सर्वोच्च न्यायालयात याचिका करण्याचा पर्याय उपलब्ध आहे. तो जर अयशस्वी झाला, तर बेल्जियम सरकार त्याचं भारताकडे प्रत्यार्पण करेल. भारतात आल्यानंतर गुन्हेगारी कट, फसवणूक आणि आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांचा सामना त्याला करावा लागेल.

<><><><><>

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने विशेष मोहीम ५.० अंतर्गत ४९३ मोहिमा राबवून ९७३ ठिकाणं आणि १०४ वाहनांची स्वच्छता केली आहे. या मोहिमेदरम्यान, १ लाख ४३ हजार किलो भंगाराची विल्हेवाट लावण्यात आली. त्यातून ४३ लाख

रुपयांपेक्षा जास्त महसूल मिळाला असून ८ हजार चौरसफुटापेक्षा जास्त जागा मोकळी झाल्याची माहिती मंत्रालयाने दिली आहे.

**<><><><><>**

युगांडातल्या कंपाला गुलु महामार्गावर आज अनेक वाहने एकमेकांवर आदळल्याने झालेल्या अपघातात ६३ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. दोन बस एकमेकांसमोर आदळल्यावर अनेक वाहनं एकमेकांवर आदळली.

**<><><><><>**

युक्रेनमधे रशियाने कालपासून केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यांमधे किमान ६ जणांचा मृत्यू झाला असून त्यात २ लहान मुलांचा समावेश आहे. या हल्ल्यांमधे अन्य २१ जण जखमी झाले आहेत. युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांनी सांगितलं की रशियाने युक्रेनच्या ऊर्जानिर्मिती केंद्रांवर केलेल्या हल्ल्यांमुळे कीवच्या अनेक भागात नागरी वस्तीत आग पसरली. याच्या प्रत्युत्तरात युक्रेनने रशियतल्या रसायन प्रकल्पावर ब्रिटीश स्टॉर्म शॅडो क्षेपणास्त्रांचा मारा केला. रशियाने अद्याप यावर काहीही भाष्य केलेलं नाही. दरम्यान रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी शस्त्रसंधीला नकार दिल्यानंतर नियोजित ट्रंप - पुतीन चर्चा अमेरिकेने पुढं ढकलली आहे.

**<><><><><>**

फ्रान्समधलं प्रसिद्ध लुव्र संग्रहालय आजपासून पुन्हा पर्यटकांसाठी खुलं केलं गेलं आहे. रविवारी या संग्रहालयात भर दिवसा फ्रेंच राजघराण्याशी संबंधित मौल्यवान वस्तुंची चोरी झाली होती. त्यानंतर हे संग्रहालय बंद ठेवलं होतं.

दरम्यान फ्रान्सच्या सरकारनं या चोरीच्या घटनेला राष्ट्रीय आपत्ती घोषित केलं आहे. चोरी झालेला राष्ट्रीय ठेवा परत आणणं हा आपला संकल्प असल्याचं राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी म्हटलं आहे.

पोलिसांनीही चोरीच्या घटनेचा तपास तीव्र केला असून, तपासात इंटरपोलची मदतही घेतली जात आहे.

**<><><><><>**

महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या साखळी फेरीत, उद्या भारत आणि न्यूझीलंड यांच्यात सामना होणार आहे. नवी मुंबईच्या डॉ. डी. वाय. पाटील क्रीडा अकादमीच्या मैदानावर दुपारी ३ वाजता हा सामना सुरु होईल.

गुणतालिकेत दोन्ही संघांनी प्रत्येकी ५ सामन्यांमधून ४ गुणांची कमाई केली आहे. त्यामुळे स्पर्धेच्या उपांत्यफेरीत प्रवेश करण्याच्यादृष्टीनं हा सामना दोन्ही संघासाठी महत्वाचा असणार आहे.

दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडच्या संघानं यापूर्वीच उपांत्य फेरीतलं स्थान पक्कं केलं आहे.

**//<><><><><>//**